भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना रजा प्रवास सवलत मंजूर करण्याबाबत कार्यपध्दती

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. एएफओ १११६/ प्र.क्र.३७४/ फ-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - २७ जून, २०१९

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय , महसूल व वन विभाग, क्र. आयएफएस-२०११/प्र.क.१६९/फ-७ दिनांक ९.८.२०११, व दि.२७.०२.२०१८
२) शासन निर्णय , महसूल व वन विभाग, क्र. एएफओ- १११६/प्र.क.३७४/फ-७ दिनांक २४.११.२०१६

<u>प्रस्तावना :</u>

उपरोक्त विषयावरील या विभागाच्या संदर्भांकित आदेशान्वये भारतीय वन सेवेच्या अधिकाऱ्यांना रजा/रजा प्रवास सवलत मंजूर करण्याबाबत सर्वंकष सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि रजा प्रवास सवलतीच्या अनुषंगाने उक्त आदेशांमध्ये अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी व क्षेत्रिय स्तरावरुन आदेश निर्गमित करताना होणाऱ्या त्रुटी टाळण्यासाठी भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना रजा प्रवास सवलत मंजूर करण्यासंदर्भातील पुढील प्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

परिपत्रक :

१. अर्जित रजेच्या/नैमित्तीक रजेच्या कालावधीतील रजा प्रवास सवलत :-

राज्य संवर्गातील भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना अर्जित रजेच्या/नैमित्तीक रजेच्या कालावधीमध्ये रजा प्रवास सवलत मंजूर करण्यासाठी (जेथे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांना प्राधिकृत केले नसेल अशा प्रकरणी) महसूल व वन विभाग सक्षम आहे. यास्तव अर्जित रजेच्या/नैमित्तीक रजेच्या अर्जासह रजा प्रवास सवलत उपभोगण्यासंदर्भातील विहित नमुन्यातील अर्ज यथोचितरित्या भरुन तो विहित मार्गाने पुढील कार्यवाहीसाठी वन विभाग/कार्यासन फ-७ यांच्याकडे शासनाचा निर्णय घेण्यास पुरेसा अवधी मिळेल अशा बेताने म्हणजे कमीतकमी १५ दिवस आधी पाठविण्यात यावा.

ज्या प्रकरणी नैमित्तीक रजा मंजूरीस्तव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांना प्राधिकृत करण्यात आले असेल, अशा प्रकरणी नैमित्तीक रजेसह रजा प्रवास सवलतीची मागणी करण्यात आली असेल तर रजा मंजूरी व रजा सवलत मंजूरी या दोन बाबी भिन्न मानण्यात येवू नयेत. सदर बाबी एकच असल्याने अशा प्रकरणी नैमित्तीक रजा मंजूरीसह रजा प्रवास सवलतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात यावा.

२. कुटूंबियांसाठी रजा प्रवास सवलत :-

या संदर्भात भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना, (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांना प्राधिकृत केले असेल, अशी प्रकरणे वगळता) नैमित्तीक रजेच्या कालावधीमध्ये रजा प्रवास सवलत उपभोगण्यास परवानगी/मंजूरी देण्यास सक्षम असलेले प्राधिकारी, अशा अधिकाऱ्यांच्या कुटूंबियांना, संबंधित अधिकाऱ्यासमवेत किंवा अन्यथा केवळ कुटूंबियांना स्वतंत्रपणे (एकत्रित किंवा निरनिराळया वेळी) रजा प्रवास सवलत (स्वग्रामी किंवा भारतात कुठेही, जसे नियमानुसार अनुज्ञेय असेल तसे) उपभोगण्यास विहित अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून परवानगी/मंजूरी देण्यासाठी सुध्दा सक्षम राहतील. मात्र अशा आदेशांच्या प्रती वन विभाग/कार्यासन फ-७ यांच्याकडे पाठविणे अनिवार्य राहील, याची प्रकर्षाने नोंद घेण्यात यावी.

३. रजा प्रवास सवलत आदेशात समाविष्ट करावयाच्या बाबी :-

भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना क्षेत्रिय कार्यालयाकडून मंजूर करण्यात येणाऱ्या रजा प्रवास सवलतीबाबतचे आदेश सदोष असतात, असे काही प्रकरणी दिसून आलेले आहे. सदर आदेशांमध्ये, इतर गोष्टींबरोबरच योग्य ते गटवर्ष, भेट द्यावयाचे निश्चित ठिकाण (राज्यासह), कुटूंबातील सदस्यांची नावे तसेच ज्या प्रकरणी १० दिवसांच्या अर्जित रजा रोखीकरणास मान्यता दिली असेल अशा प्रकरणी यापूर्वी किती वेळा अर्जित रजा रोखीकरण घेण्यात आले आहे याचा उल्लेख न चुकता करण्यात यावा. अर्ज सादर करताना अर्जित रजेच्या रोखीकरणाची मागणी करणाऱ्या अधिकाऱ्याने यापूर्वी किती वेळा लाभ घेतला आहे, हे अर्जामध्ये नमूद करावे.

४. कार्योत्तर मंजूरीची प्रकरणे (Ex-post facto Sanction) :-

रजा प्रवास सवलतीच्या नियमांनुसार अधिका-याने भेट द्यावयाचे ठिकाण प्रवास सुरु करण्यापूर्वी कळविणे बंधनकारक आहे. एखाद्या अपवादात्मक प्रकरणी रजा प्रवास सवलती अंतर्गत भेट द्यावयाचे ठिकाण हे प्रवास सुरु होण्यापूर्वी कळविले नसल्यास व ते नंतर कळविण्यात आल्यास, सदर विनंती ही शासकीय कर्मचाऱ्याच्या/अधिकाऱ्याच्या मर्यादेपलिकडील परिस्थितीमुळे/ कारणांमुळे उद्भवली आहे, अशी विभागाच्या सचिवांची खात्री झाल्यास ते अशा प्रकरणी अधिकाऱ्याला / त्यांच्या कुटूंबियांना रजा प्रवास सवलतीसाठी कार्योत्तर मंजूरी देऊ शकतील.

उक्त सूचनांनुसार, अधिकाऱ्याने रजा प्रवास सवलतीअंतर्गत कार्योत्तर मंजूरीची मागणी केल्यास, सदर मागणीसंदर्भात, कार्योत्तर मंजूरीची मागणी कोणत्या परिस्थितीत करण्यात आली आहे, याबाबतचे समर्थन संबंधित अधिकाऱ्याकडून घेऊन अशी प्रकरणे निर्णयासाठी सचिव/प्रधान सचिव /अ.मु.स. (वने), महसूल व वन विभाग यांच्याकडे पाठवावीत.

२. उपरोक्त सूचनांव्यतिरिक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील इतर सूचना पूर्वीप्रमाणे लागू राहतील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२७१७१९५२६६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a6498 6631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.06.28 11:10:14 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय),
महसूल व वन विभाग

प्रत :

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव यांचे उपसचिव
५. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादीत, नागपूर
९. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११.सहायक संचालक भावसे-लेखा, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.निवड नस्ती.